# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 16/12/2022 (शुक्रवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– दिनांक १६/१०/२०२० चे २१.११ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. ३९१/२०२० कलम ३७६(२) (एन), ३७६(३), ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवी सहकलम ४, ०६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

एप्रिल २०२० ते दिनांक १६/१०/२०२० चे १२.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन मुलगी (१२ वर्षीय पिडीता) व मुलगा हे दोन्ही बकऱ्या चारण्यासाठी गेले असता गुन्हयातील आरोपी नामे– मनिष रविंद्र चौधरी, वय २५ वर्ष, रा. निलज खंडाळा कन्हान याने १०००/– रू. देतो म्हणुन आरोपीने जबरदस्तीने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीशी शारीरीक संभोग केला. तसेच कोणाला काही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक लक्ष्मी मलकुवार पो.स्टे. खापरखेडा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक १६/१२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. श्रीखंडे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०२ महिने कारावास, कलम ३२३ भांदवि. मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास, कलम ५०४, ५०६ भांदवि. मध्ये प्रत्येकी ०२ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. विजया बालपांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन कर्मचारी पोशि/१४६८ सैफल्लाह अहमद पोलीस स्टेशन कन्हान यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर